RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MH/MR/South-322/2013-15

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष ४, अंक १३(२)] शनिवार, मार्च २, २०१३/फाल्गुन ११, शके १९३४ [पृष्ठे १३, किंमत : रुपये २५.००

**असाधारण क्रमांक २६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सामान्य प्रशासन विभाग**

(माहिती तंत्रज्ञान संचालनालय), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ मार्च २०१३.

**अधिसूचना**

**माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २०००.**

क्रमांक डीआयटी. २०११/प्र.क्र. १७५/३९.— माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० (२००० चा २१), याची कलमे ६ व ६-क यांच्यासह कलम ९० यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, पुढील नियम करीत आहे :—

१. **संक्षिप्त नाव**.— या नियमांना, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान (इलेक्ट्रॉनिक सेवा वितरण) नियम, २०१३, असे म्हणावे. (ते शासकीय राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.)

२. **व्याख्या**.— (१) या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " अधिनियम " याचा अर्थ, माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २०००, असा आहे;

(ख) " अधिकृत अभिकर्ता " याचा अर्थ अधिकृत सेवा प्रदात्याचा अभिकर्ता, असा आहे आणि ज्याला या नियमांन्वये विनिर्दिष्ट केलेल्या कार्यपद्धतीस अनुसरून संगणक साधन किंवा कोणतेही संदेशवहन साधन यांच्या मदतीने उपयोगकर्त्यांना सार्वजनिक सेवांचे वितरण करण्यास परवानगी दिलेली आहे, असा इलेक्ट्रॉनिकरीत्या सहाय्यभूत माहिती केंद्राचा (इलेक्ट्रॉनिकली इनेबल्ड किऑस्क) किंवा दर्शनी कक्षाचा (फ्रंट ऑफिस) चालक, याचा त्यामध्ये समावेश होतो;

(ग) " अधिकृत सेवा प्रदाता " याचा अर्थ, या नियमांनुसार इलेक्ट्रॉनिक रीतीने (इलेक्ट्रॉनिकली) सेवा वितरण करणारी यंत्रणा सुस्थापित करण्यासाठी व तिचे व्यवस्थापन करण्यासाठी, संचालक, इलेक्ट्रॉनिक सेवा वितरण यांनी प्राधिकृत केलेले, निगम निकायासह अभिकरण किंवा शासनाचे अभिकरण, असा आहे;

(घ) " निगम निकाय " याचा अर्थ, कोणतीही कंपनी असा असून त्यामध्ये व्यावसायिक संस्था, एक मालकी संस्था किंवा वाणिज्यिक अथवा व्यावसायिक कार्यांमध्ये कार्यरत असलेल्या व्यक्तींचा अन्य संघ यांचा समावेश होतो;

(ङ) " प्रमाणपत्र " याचा अर्थ कोणत्याही अशा अधिनियम, नियम, विनियम किंवा शासनाच्या आदेशानुसार, एखाद्या व्यक्तीचा एकतर नैसर्गिक अथवा विधिनिर्मित दर्जा, अधिकार वा जबाबदारी कायम करण्याकरिता प्रमाणपत्र देण्याच्या हेतूने, संबंधित अधिनियम,

नियम, विनियम किंवा शासनाच्या आदेशांन्वये अधिकार असलेल्या प्राधिकाऱ्याने देणे आवश्यक असलेले प्रमाणपत्र, असा आहे आणि त्यामध्ये, संचालक, इलेक्ट्रॉनिक सेवा वितरण निर्धारित करील अशा साहित्यावर इलेक्ट्रॉनिक स्वरूपात छापलेले आणि अधिकृत सेवा प्रदात्याने इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरीनिशी दिलेले प्रमाणपत्र याचा समावेश होतो;

(च) "सक्षम प्राधिकारी" याचा अर्थ, शासनाचे सचिव, राज्य शासनाच्या प्रत्येक विभागाचा प्रमुख आणि राज्य शासन वेळोवेळी अधिसूचित करील, असे शासकीय संघटना व शासकीय निकाय यांचे प्रमुख, असा आहे;

(छ) "संचालक, इलेक्ट्रॉनिक सेवा वितरण" याचा अर्थ, संचालक, इलेक्ट्रॉनिक सेवा वितरण म्हणून अधिसूचित केलेला शासनाचा अधिकारी, असा आहे;

(ज) "ई-सेवा" याचा अर्थ, शासन अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील आणि उपयोगकर्त्यांपर्यंत इलेक्ट्रॉनिक रीतीने वितरित करील अशी सेवा, असा आहे;

(झ) "इलेक्ट्रॉनिक सेवा वितरण" याचा अर्थ, इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे नमुने व अर्ज प्राप्त करणे, कोणतेही लायसन, परवाना, प्रमाणपत्र, मंजुरी अथवा मान्यता देणे आणि पैसे स्वीकारणे वा प्रदान करणे यांच्या स्वरूपात सार्वजनिक सेवांचे किंवा या नियमांन्वये विनिर्दिष्ट केलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करून दिल्या जाणाऱ्या अशा अन्य कोणत्याही सार्वजनिक सेवेचे वितरण, असा आहे;

(ञ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

(ट) "अधिसूचना" याचा अर्थ, शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केलेली अधिसूचना, असा आहे;

(ठ) "शासकीय राजपत्र" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन राजपत्र, असा आहे;

(ड) "सार्वजनिक सेवा" याचा अर्थ, शासनाने एकतर आपल्या सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत किंवा आपल्या कोणत्याही अभिकरणामार्फत थेट अथवा कोणत्याही अधिकृत सेवा प्रदात्याद्वारे पुरविलेली कोणतीही सेवा, असा असून त्यामध्ये, इतर गोष्टींबरोबरच, नमुने व अर्ज प्राप्त करणे, कोणतेही लायसन, परवाना, प्रमाणपत्र मंजुरी अथवा मान्यता देणे आणि पैसे स्वीकारणे वा प्रदान करणे, यांचा समावेश असेल;

(ढ) "सेवा आकार" याचा अर्थ, देण्यात येणाऱ्या सेवांचे इलेक्ट्रॉनिक रीतीने वितरण करण्याकरिता अधिकृत सेवा प्रदात्याला देय असेल अशी, शासन विनिर्दिष्ट करील अशी रक्कम, असा आहे, परंतु त्यामध्ये, संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज करतेवेळी संबंधित अधिनियम, नियम, विनियम किंवा शासनाचा आदेश यान्वये जे अन्यथा देय झाले असते असे, कोणत्याही व्यक्तीकडून संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याला एखाद्या सेवेबाबत देय असलेले कोणतेही यथाप्रमाण अधिकृत कर, आकार, देणी अथवा येणे असलेला अन्य कोणताही पैसा, यांचा समावेश असणार नाही;

(ण) "स्वाक्षरीकर्ता प्राधिकारी" याचा अर्थ, कोणतेही लायसन, परवाना, प्रमाणपत्र, मंजुरी किंवा मान्यता देण्याकरिता संबंधित अधिनियम, नियम, विनियम अथवा शासनाचा आदेश यान्वये अधिकार प्रदत्त प्राधिकारी, असा आहे;

(त) "विनिर्दिष्ट" याचा अर्थ, शासनाने राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट केलेले, असा आहे;

(थ) "राज्य इलेक्ट्रॉनिक अभिलेख भांडार" याचा अर्थ, इलेक्ट्रॉनिकरीत्या स्वाक्षरित केलेला अभिलेख नागरिकांना पहावयास मिळावा आणि त्यांना देता यावा, म्हणून सक्षम प्राधिकाऱ्यांनी ठेवलेल्या अशा सर्व इलेक्ट्रॉनिकरीत्या स्वाक्षरित अभिलेखाचे इलेक्ट्रॉनिक भांडार असा आहे;

(२) या नियमांमध्ये वापरलेले व व्याख्या न केलेले, परंतु अधिनियमांमध्ये व्याख्या केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना अधिनियमांमध्ये जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील.

३. **इलेक्ट्रॉनिक सेवा वितरण प्रणाली.**— (१) कार्यक्षम वितरणाच्या प्रयोजनार्थ, इलेक्ट्रॉनिकरीत्या सहाय्यभूत केंद्रामार्फत (किऑक्स) अथवा इलेक्ट्रॉनिक सेवा वितरणासाठीच्या अन्य कोणत्याही यंत्रणेमार्फत सार्वजनिक सेवा वितरित करण्याच्या उद्देशाने, शासनास अधिकृत सेवा प्रदात्याला प्राधिकार देता येईल.

**स्पष्टीकरण.**— याद्वारे असे स्पष्ट करण्यात येते की, विद्यमान नियमांमध्ये अधिकृत सेवा प्रदाते आणि अधिकृत अभिकर्ते यांच्यामार्फत ई-सेवांचे वितरण करण्याबाबतच्या प्रशासनाविषयी तरतूद करण्यात आली आहे, तर, ई-सेवा वितरणाच्या अन्य यंत्रणा, जसे राज्य ऑनलाईन दालन (पोर्टल), शासकीय विभागीय वितरण केंद्र आणि उपयोगकर्त्यांना थेट वेबवर पुरविण्यात येणाऱ्या ऑनलाईन सेवा यांचे प्रशासन हे, शासकीय विभाग व अभिकरणे यांच्याकडून सर्वसामान्य रीतीने करण्यात येईल.

(२) कोणत्याही ई-सेवेच्या संबंधात या नियमांखालील अर्जाचा नमुना व देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्राचा नमुना, शासन विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे असेल.

४. इलेक्ट्रॉनिक रीतीने वितरित्त करण्यात येणाऱ्या सार्वजनिक सेवांची सूची अधिसूचित करण्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे कर्तव्य.— (१) प्रत्येक सक्षम प्राधिकारी, हे नियम अंमलात आल्यापासून एकशे ऐंशी दिवसांच्या कालावधीच्या आत पुढील बाबी अधिसूचित करील,—

(क) इलेक्ट्रॉनिक रीतीने वितरितकरता येतील अशा, विभागाच्या, अभिकरणाच्या किंवा निगमाच्या सार्वजनिक सेवा ;

(ख) इलेक्ट्रॉनिक रीतीने ज्या दिनांकापर्यंत अशी प्रत्येक सेवा उपलब्ध करून देण्यात येईल तो दिनांक ;

(ग) सेवा-स्तरांच्या स्वरूपामध्ये कार्यक्षमता, गुणवत्ता व अचूकता आणण्यासाठी घालून द्यावयाची प्रमाणके ;

(घ) इलेक्ट्रॉनिक रीतीने अशा प्रत्येक सेवेचे वितरण करण्यासाठीचे पदनिर्देशित अधिकारी.

(२) सक्षम प्राधिकारी, या प्रकाशनांचे प्रत्येक वर्षी अथवा आवश्यक असेल अशा वारंवारतेने पुनरीक्षण करील आणि ती अद्ययावत करील.

५. **स्वाक्षरीकर्ता प्राधिकारी अधिसूचित करणे.**— (१) सक्षम प्राधिकारी, विविध सार्वजनिक सेवांच्या बाबतीत स्वाक्षरीकर्ता प्राधिकाऱ्यांच्या राज्यातील संबंधित अधिकारक्षेत्राच्या स्थानिक हद्दी, यथोचितरीत्या विनिर्दिष्ट केलेले अशा सेवेचे स्वरूप, स्वाक्षरीकर्ता प्राधिकाऱ्यांची नावे, प्राधिकाऱ्याचा कालावधी तसेच अशा प्रत्येक प्राधिकाऱ्याच्या अधिकारितेची मर्यादा यांसह स्वाक्षरीकर्ता प्राधिकाऱ्यांची सूची अधिसूचित करतील.

(२) सक्षम प्राधिकारी, स्वाक्षरीकर्ता प्राधिकाऱ्यांची पदे धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांची निवृत्ती, बदली, निलंबन अथवा सेवासमाप्ती याबाबत तात्काळ संचालक, इलेक्ट्रॉनिक सेवा वितरण यांस कळवतील.

(३) स्वाक्षरीकर्ता प्राधिकारीदेखील आपली निवृत्ती, बदली, निलंबन अथवा सेवासमाप्ती याबाबत तात्काळ आपल्या सक्षम प्राधिकाऱ्यांना कळवतील, आणि सक्षम प्राधिकारी त्यांच्या संबंधित ॲप्लिकेशन § सॉफ्टवेअरमध्ये उप-नियम (२) मध्ये उल्लेखिलेले बदल करून घेतील.

६. **संचालक, इलेक्ट्रॉनिक सेवा वितरण यांची कार्ये व अधिकार.**— संचालक, इलेक्ट्रॉनिक सेवा वितरण हा पुढील कार्ये पार पाडील व अधिकारांची अंमलबजावणी करील :—

(क) अधिकृत सेवा प्रदात्याच्या सेवांना परवानगी देणे, त्या मध्येच थांबविणे किंवा समाप्त करणे ;

(ख) अधिकृत सेवा प्रदात्यांकडून केल्या जाणाऱ्या अधिकृत अभिकर्त्यांच्या निवडीसंबंधातील प्रमाणके निर्धारित करणे ;

(ग) अधिकृत सेवा प्रदाते आणि अधिकृत अभिकर्ता यांची कार्ये, जबाबदारी व दायित्वे निर्धारित करणे ;

(घ) अधिकृत सेवा प्रदाते आणि अधिकृत अभिकर्ता यांनी सेवा-स्तरांवर अनुपालन करावयाची प्रमाणके निर्धारित करणे ;

(ङ) ई-सेवा देण्याबद्दल अधिकृत सेवा प्रदाते आणि अधिकृत अभिकर्ता यांनी आकारावयाचे सेवा आकार निर्धारित करणे ;

(च) अधिकृत सेवा प्रदाते आणि अधिकृत अभिकर्ता यांच्या सेवांना मान्यता देणे, त्या मध्येच थांबविणे अथवा समाप्त करणे यासबंधातील अटी व शर्ती निर्धारित करणे ; आणि

(छ) अधिकृत सेवा प्रदाते आणि अधिकृत अभिकर्ता यांच्या सेवा मध्येच थांबविण्याच्या अथवासमाप्त करण्याच्या बाबतीत, ई-सेवांच्या वितरणाची पर्यायी व्यवस्था करणे.

७. **इलेक्ट्रॉनिक सेवा वितरणाकरिता अधिकृत सेवा प्रदाते.**— अधिकृत सेवा प्रदाता, संचालक, इलेक्ट्रॉनिक सेवा वितरण याने निर्धारित केल्याप्रमाणे यथोचित वितरण-सुविधा उभारुन आणि अधिकृत अभिकर्त्यांचे जाळे पसरवून, या नियमांना अनुसरुन, उपयोगकर्त्यांना अधिसूचित सार्वजनिक सेवा इलेक्ट्रॉनिकरित्या पुरवील.

८. **अधिकृत सेवा प्रदात्यांनी अधिकृत अभिकर्त्यांची नेमणूक करणे.**— (१) अधिकृत सेवा प्रदात्यास, सक्षम प्राधिकाऱ्याने घालून दिलेल्या कार्यक्षमता, गुणवत्ता व अचूकता यांच्या प्रमाणकांची पूर्तता करण्याकरिता इलेक्ट्रॉनिक रीतीने सेवा वितरणासाठी आवश्यक असतील अशा प्रमाणात अधिकृत अभिकर्त्यांची नेमणूक करता येईल.

(२) अधिकृत सेवा प्रदाता, तो स्वतः तसेच सर्व अधिकृत अभिकर्ते इलेक्ट्रॉनिकरित्या सार्वजनिक सेवा वितरणाचे काम सुरू करण्यापूर्वी डिजीटल स्वाक्षरी प्रमाणपत्र मिळवतील याची खात्री करून घेईल.

(३)अधिकृत अभिकर्त्यांना, इलेक्ट्रॉनिक सेवांचे कार्यक्षम व दोषमुक्त रीतीने वितरण करण्यासाठी आवश्यक असलेले कौशल्य अवगत करून देता यावे म्हणून अधिकृत सेवा प्रदात्यास त्या अभिकर्त्यांना यथोचित प्रशिक्षण देखील देता येईल.

९. **अधिकृत सेवा प्रदात्यांनी काम सुरू करणे.**— अधिकृत सेवा प्रदाता पुढील बाबी केल्यानंतरच आपल्या व्यावसायिक कामास सुरुवात करील,—

(क) या नियमांन्वये विनिर्दिष्ट केलेली कार्यपद्धती व मानके अंगीकारण्याबाबत त्याने संचालक, इलेक्ट्रॉनिक सेवा वितरण यास लिखित अथवा यथोचितरित्या डिजीटल स्वाक्षरित केलेल्या ई-मेल मार्फत खात्री दिलेली असेल; आणि

(ख) संचालक, इलेक्ट्रॉनिक सेवा वितरण याने घालून दिलेल्या प्रमाणकांनुसार इलेक्ट्रॉनिक सेवांचे कार्यक्षम व दोषमुक्त रीतीने वितरण करण्याकरिता आवश्यक असलेल्या सुविधा व पायाभूत सोयी त्याने उभारलेल्या आहेत आणि त्याबाबत त्याने संचालक, इलेक्ट्रॉनिक सेवा वितरण यास लिखित अथवा यथोचितरीत्या डिजीटल स्वाक्षरित केलेल्या ई-मेल मार्फत खात्री दिलेली असेल.

१०. **अधिकृत सेवा प्रदात्याने सेवा आकार वसूल करणे.**— (१) उपयोगकर्त्याने अधिकृत सेवा प्रदात्याकडे अथवा अधिकृत अभिकर्त्याकडे सादर केलेल्या ई-सेवेबाबतच्या अर्जासोबत, संचालक, इलेक्ट्रॉनिक सेवा वितरण याने निर्धारित केलेला सेवा आकार प्रदान केला जाईल. हा सेवा आकार अर्ज करतेवेळी अधिकृत सेवा प्रदात्याला रोख स्वरूपात देय असेल.

(२) संचालक, इलेक्ट्रॉनिक सेवा वितरण यास, ई-सेवांसाठी अधिसूचनेद्वारे सेवा आकार निर्धारित करता येतील.

(३) वेगवेगळ्या ई-सेवांकरिता वेगवेगळे सेवा आकार असतील, जसा—

(क) सद्य:स्थितीबाबतची चौकशी;

(ख) ई-सेवांशी संबंधित मुद्रित प्रत (प्रिंट आऊट);

(ग) ई-सेवांशी संबंधित दस्तऐवजांचे क्रमवीक्षण (स्कॅनिंग);

(घ) पोच-पावती;

(ङ) अन्य कोणतीही ई-सेवा.

(४) संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज करतेवेळी संबंधित अधिनियम, नियम, विनियम किंवा शासनाचा आदेश यान्वये जे अन्यथा देय झाले असते असे, कोणत्याही व्यक्तीकडून संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याला एखाद्या सेवेबाबत देय असलेले कोणतेही यथाप्रमाण अधिकृत कर, आकार, देणी अथवा येणे असलेला अन्य कोणताही पैसा यांचा सेवा आकारामध्ये समावेश असणार नाही.

११. **सेवा प्रदात्याने फी वसूल करणे.**— (१) संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज करतेवेळी संबंधित अधिनियम, नियम, विनियम किंवा शासनाचा आदेश यान्वये जी अन्यथा देय झाली असती अशी, कोणत्याही व्यक्तीकडून संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याला एखाद्या सेवेबाबत देय असलेली कोणतीही फी किंवा यथाप्रमाण अधिकृत कर, आकार, देणी अथवा येणे असलेला अन्य कोणताही पैसा हेदेखील प्राधिकृत सेवा प्रदाता किंवा, यथास्थिति, अधिकृत अभिकर्ता वसूल करील. मात्र यात न्यायालय फी मुद्रांक किंवा कोषागार चलान यांच्या स्वरूपात प्रदान करणे हे सर्वसामान्यत: आवश्यक असलेली प्रदाने यांचा अपवाद असेल.

(२) अधिकृत सेवा प्रदात्याने किंवा अधिकृत अभिकर्त्याने वसूल केलेली फी, संचालक, इलेक्ट्रॉनिक सेवा वितरण याने निर्धारित केल्याप्रमाणे अधिकृत सेवा प्रदात्याकडून किंवा यथास्थिती, अधिकृत अभिकर्त्याकडून पूर्णपणे शासकीय कोषागारात भरण्यात येईल.

१२. **सेवा प्रदात्याने सेवा आकार व शुल्क भरणे.**— (१) अधिकृत सेवा प्रदात्याने किंवा अधिकृत अभिकर्त्याने ई-सेवेसाठी वसूल केलेल्या सेवा आकारामधील संचालक, इलेक्ट्रॉनिक सेवा वितरण यांनी वेळोवेळी निर्धारित केलेली सेवा आकाराची टक्केवारी, शासनाला विभागून देता येईल.

(२) अशाप्रकारे वसूल केलेल्या सेवा आकारामधील शासनाचा हिस्सा अधिकृत सेवा प्रदाता किंवा अधिकृत अभिकर्त्याकडून, संचालक, इलेक्ट्रॉनिक सेवा वितरण निर्धारित करील त्याप्रमाणे शासनाच्या कोषागारात भरण्यात येईल.

१३. **सेवा प्रदात्याला प्रदान केलेल्या सेवा आकारासंबंधातील गृहितक व ई-सेवा मिळण्यासाठीच्या इतर शर्ती.**— (१) कोणतीही व्यक्ती, कोणत्याही अधिसूचित ई-सेवेच्या संबंधात, अधिकृत सेवा प्रदात्याला किंवा अधिकृत अभिकर्त्याला सेवा आकार प्रदान करीत असेल तेथे, संचालक, इलेक्ट्रॉनिक सेवा वितरण यांनी निर्धारित केलेल्या प्रस्तुत नमुन्यात व त्या रीतीने प्रदान केल्याची पोच देणारी आणि अधिकृत सेवा प्रदात्याने किंवा अधिकृत अभिकर्त्याने अशा व्यक्तीला दिलेली मुद्रित प्रत किंवा इलेक्ट्रॉनिक सूचना ही, अशा प्रदानाचा पुरावा म्हणून सामान्यत: स्वीकारण्यात येईल आणि सामान्य परिस्थितीमध्ये ज्यासाठी ही पोच देण्याचे अभिप्रेत असेल अशा देय रकमांची किंवा मागण्यांची त्या मर्यादेपर्यंत पूर्तता करण्यात आली आहे असे गृहित धरण्यात येईल.

(२) अधिकृत सेवा प्रदात्याला किंवा अधिकृत अभिकर्त्याला केलेले सेवा आकारांचे प्रदान हे, अधिसूचित ई-सेवा मिळण्याच्या संबंधात, संबंधित व्यक्तीच्या नावे तात्पुरत्या किंवा कायम स्वरूपाचा कोणताही अधिकार किंवा हक्क निर्माण करणार नाही.

(३) अधिकृत सेवा प्रदात्याला किंवा अधिकृत अभिकर्त्याला प्रदान करण्याच्या वेळी, सेवा वितरणाशी संबंधित असलेल्या सर्व शर्तींची पूर्णपणे पूर्तता केली नाही तर, केवळ असे प्रदान केल्यामुळे, सेवा वितरणाशी आवश्यक ती सुनिश्चिती केली जाणार नाही.

१४. **इलेक्ट्रॉनिक सेवा वितरण प्रणालीचा स्वीकार करून शासनाकडे किंवा शासनाच्या नावे पैसे जमा करणे किंवा प्रदान करणे.**—इलेक्ट्रॉनिक सेवा वितरण प्रणालीचा स्वीकार करून शासनाकडे किंवा शासनाच्या नावे जमा केलेला किंवा प्रदान केलेला पैसा हा, शासनाच्या वित्तीय संहितेचे आणि कोषागार संहितेचे अनुपालन करण्याच्या हेतूने जमा केलेला किंवा प्रदान केलेला पैसा असल्याचे मानण्यात येईल.

१५. **नमुना, अर्ज किंवा इतर कोणताही दस्तऐवज दाखल करणे.**— (१) अधिनियमाच्या कलम ६च्या पोट-कलम (१) च्या खंड (क) मध्ये निर्देश केलेले कोणताही नमुना, अर्ज किंवा इतर कोणताही दस्तऐवज, शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या ॲप्लिकेशन सॉफ्टवेअरचा वापर करून शासनाने प्राधिकृत केलेले कोणतेही कार्यालय, प्राधिकरण, संस्था, अभिकरण किंवा अधिकृत सेवा प्रदाता यांच्याकडे दाखल करता येईल.

(२) असे सॉफ्टवेअर विकसित करतेवेळी, पोट नियम (१) मध्ये निर्देश केलेले कार्यालय, प्राधिकरण, अभिकरण किंवा अधिकृत सेवा प्रदाता, इलेक्ट्रॉनिक नोंदींची पुढील वैशिष्ट्ये विचारात घेईल :—

(क) कायम स्वरूपी टिकणाऱ्या ;

(ख) जतन करून ठेवता येणे ;

(ग) सहजपणे माहिती मिळविता येणे ;

(घ) वाचनीयता ;

(ङ) संलग्न माहितीच्या संबंधात सर्वसमावेशकता ;

(च) अधिप्रमाणता व समग्रता यांनुसार पुराव्यासंबंधी मूल्य ;

(छ) नष्ट करण्यावर नियंत्रण ; आणि

(ज) भर टाकता येणे.

१६. **कोणतेही लायसन, परवाना, मंजुरी किंवा मान्यता पाठविणे किंवा देणे.**— (१) अधिनियमाच्या कलम ६च्या पोट-कलम (१) च्या खंड (ख) मध्ये निर्देश केलेले कोणतेही लायसन, परवाना, मंजुरी किंवा मान्यता नियम १५ अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या ॲप्लिकेशन सॉफ्टवेअरचा वापर करून पाठवता येईल किंवा देता येईल.

(२) अशाप्रकारे पाठविलेले लायसन, परवाना, प्रमाणपत्र, मंजुरी किंवा मान्यता ही, संबंधित अधिनियम, नियम, विनियम किंवा आदेश यांमध्ये विहित केलेल्या नमुन्यात असेल आणि त्यामध्ये इलेक्ट्रॉनिक नोंद केल्याचा दिनांक व वेळ यांसह ज्याने इलेक्ट्रॉनिक नोंदीवर डिजीटल स्वाक्षरी केली होती व मान्यता दिली होती अशा स्वाक्षरी करणाऱ्या प्राधिकाऱ्याच्या नावाचा व पदनामाचा समावेश असेल.

१७. **डिजीटल स्वाक्षरी केलेल्या इलेक्ट्रॉनिक नोंदींचे संकेतस्थान निर्माण करणे.**— (१) सक्षम प्राधिकाऱ्याला, हे नियम अंमलात आल्यानंतर अधिकृतसेवा प्राधिकाऱ्यांना किंवा अधिकृत अभिकर्त्यांना अशी लायसने, परवाने, प्रमाणपत्रे, मंजुरी किंवा, यथास्थिति मान्यता सहजपणे मिळणे आणि ती वापरकर्त्यांना देणे शक्य व्हावे यासाठी सहयोगी ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर व वर्कफ्लो यांसह डिजीटल स्वाक्षरी केलेल्या इलेक्ट्रॉनिक नोंदींचे संकेतस्थान व आधारसामग्री तयार करता येईल, निर्माण करता येईल आणि जतन करून ठेवता येईल.

(२) अशा सक्षम प्राधिकाऱ्यांकडून, इलेक्ट्रॉनिक आधारसामग्री, माहिती, अर्ज, डिजीटल स्वाक्षरी केलेल्या इलेक्ट्रॉनिक नोंदींचे संकेतस्थान आणि आपआपल्या नियंत्रणाखालील माहिती तंत्रज्ञान मत्ता यांच्यासंबंधात शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या प्रस्तुत सुरक्षा कार्यपद्धतीचे अनुपालन करण्यात येईल.

१८. **डिजीटल स्वाक्षरी केलेल्या इलेक्ट्रॉनिक नोंदींच्या संकेतस्थानामध्ये बदल करण्याची कार्यपद्धती.**—(१) कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याला किंवा स्वाक्षरी करणाऱ्या कोणत्याही प्राधिकाऱ्याला एकतर स्वाधिकारे, किंवा हितसंबंधित पक्षकाराने अर्ज केल्यावर, संबंधित अधिनियम, नियम, विनियम किंवा आदेश यांमध्ये विहित केलेल्या कार्यपद्धतीचे अनुपालन केल्यानंतर, डिजीटल स्वाक्षरी केलेल्या इलेक्ट्रॉनिक नोंदींच्या संकेतस्थानामध्ये उचित बदल करता येईल किंवा उचित बदल करण्याचा आदेश देता येईल.

(२) अशा कोणत्याही प्राधिकाऱ्याला, केवळ त्याच्या स्वत:च्या अधिकारितेसंबंधातील इलेक्ट्रॉनिक नोंदींच्या बाबतीत बदल करण्याचे किंवा बदल करण्याचा आदेश देण्याचे विशेषाधिकार असतील.

(३) डिजीटल स्वाक्षरी केलेल्या इलेक्ट्रॉनिक नोंदींच्या संकेतस्थानातील कोणत्याही नोंदीत केलेल्या कोणत्याही बदलामध्ये आणि इलेक्ट्रॉनिक नोंदींच्या अशा संकेतस्थानामधील नोंदीमध्ये कोणतीही भर घालताना किंवा ती वगळताना, संबंधित प्राधिकाऱ्याने केलेल्या डिजीटल स्वाक्षरीत बदल केला जाणार नाही आणि अशा सर्व बदलांचा इलेक्ट्रॉनिक ऑडिट ट्रेल ठेवण्यात येईल.

१९. **इलेक्ट्रॉनिक सेवा पुरविण्यासाठी सुरक्षित ॲप्लिकेशन सॉफ्टवेअरची निर्मिती.**— (१) सक्षम प्राधिकाऱ्यांना, निर्माण केलेले योग्य असे ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर मिळेल, त्या सॉफ्टवेअरचा वापर करून, स्वाक्षरी करणारे प्राधिकारी, लायसन, परवाना, प्रमाणपत्र, मंजुरी किंवा मान्यता यांवर डिजीटल स्वाक्षरी करतील आणि हे सॉफ्टवेअर बसवण्यापूर्वी, त्याची सुरक्षितता, विश्वासार्हता, कामगिरी व सुसंगती याबाबत सुनिश्चिती करण्याच्या दृष्टीने, त्रयस्थ पक्षकार अभिकरणाकडून तपासणी केलेले तेच सॉफ्टवेअर मिळेल.

(२) अशा प्रत्येक ॲप्लिकेशन सॉफ्टवेअरमध्ये, इतर गोष्टींबरोबर, प्रत्येक लायसन, परवाना, प्रमाणपत्र, मंजुरी किंवा मान्यता यांसाठी असाधारण ओळखचिन्ह (unique identification) नेमून देण्याची क्षमता असेल.

(३) प्रत्येक अधिकृत सेवा प्रदाता, संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांशी विचारविनिमय करून आपले स्वतःचे ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर तयार करील की जे, अशा अधिकृत सेवा प्रदात्यांना, या नियमांनुसार इलेक्ट्रॉनिक सेवा वितरणासाठी उपयोगी पडेल.

(४) एकतर सक्षम प्राधिकाऱ्याने किंवा अधिकृत सेवा प्रदात्याने तयार केलेल्या अशा प्रत्येक ॲप्लिकेशन सॉफ्टवेअरमध्ये, इतर गोष्टींबरोबर, खालील वैशिष्ट्ये व क्षमता असतील :—

(क) डिजीटल स्वाक्षरी प्रमाणपत्राचा वापर करून ॲप्लिकेशन प्रणालीतून माहिती मिळण्यासाठी (access) आवश्यक असल्याप्रमाणे अधिकृत अभिकर्त्यांचे सुरक्षित लॉगइन करणे.

(ख) डिजीटल स्वाक्षरी केलेले लायसन, परवाना, प्रमाणपत्र, मंजुरी किंवा मान्यता यांचे मुद्रण करण्यासाठी व ते देण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यांनी जतन केलेल्या डिजीटल स्वाक्षरी असलेल्या इलेक्ट्रॉनिक नोंदींच्या संकेतस्थानांवर अधिकृत अभिकर्त्यांचा सुरक्षित ॲक्सेस असणे.

(ग) नागरिकांना इलेक्ट्रॉनिक सेवा पुरवितेवेळी कोणत्याही अधिकृत अभिकर्त्याने दिलेले प्रमाणक किंवा पोचपावती यांना असाधारण ओळखचिन्ह नेमून देणे.

(५) अधिकृत सेवा प्रदात्याने ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर बसविण्यापूर्वी त्याची सुरक्षितता, विश्वसनीयता, कामगिरी व सुसंगती या दृष्टीने सुनिश्चिती करण्यासाठी, त्रयस्थ पक्षकार अभिकरणाने तपासणी केलेले असे ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर, संचालक, इलेक्ट्रॉनिक सेवा वितरण यांना मिळेल.

२०. **अधिकृत सेवा प्रदात्याने किंवा अधिकृत अभिकर्त्याने ई-सेवा पुरविणे.**— (१) कोणतेही लायसन, परवाना, प्रमाणपत्र, मंजुरी किंवा मान्यता देण्याच्या संबंधात सेवा पुरविण्यासाठी आणि पैसे जमा करण्यासाठी किंवा भरण्यासाठी वापरकर्त्याने विनंती केल्यावर अधिकृत सेवा प्रदाता किंवा प्राधिकृत अभिकर्ता हा, कोणतेही लायसन, परवाना, प्रमाणपत्र किंवा मान्यता देण्याच्या किंवा कोणतीही रक्कम भरण्याच्या किंवा जमा करण्याच्या संबंधातील आधारसामग्रीच्या बाबतीत नियम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या त्यांच्या संरक्षित ॲप्लिकेशनद्वारे डिजीटल स्वाक्षरी केलेल्या इलेक्ट्रॉनिक नोंदींच्या संबंधित विभागीय संकेतस्थानावर प्रवेश (access) देईल.

(२) प्राधिकृत सेवा प्रदात्याला किंवा अधिकृत अभिकर्त्याला, त्याच्या डिजीटल स्वाक्षरी प्रमाणपत्राचा वापर करून केवळ असा प्रवेश देण्यासाठी परवानगी देण्यात येईल.

(३) अधिकृत सेवा प्रदाता किंवा अधिकृत अभिकर्ता हा सेवा आकाराबरोबर विनिर्दिष्ट केलेली फी, कर, शुल्क किंवा देय रकमा यांचा स्वीकार करील, संबंधित लायसन, परवाना, प्रमाणपत्र, मंजुरी किंवा मान्यता किंवा कोणतेही प्रदान किंवा जमा रकमा यांच्या संबंधातील आधारसामग्रीच्या नोंदी डाऊनलोड करून, डिजीटल स्वाक्षरी केलेल्या इलेक्ट्रॉनिक नोंदींमधील लायसन, परवाना, प्रमाणपत्र, मंजुरी किंवा मान्यता किंवा प्रस्तुत आधारसामग्रीतील प्रदानाचे प्रमाणक किंवा पोचपावती यांचे मुद्रित घेईल आणि सुरक्षित ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर व सुरक्षित लेखनसामग्री यांचा वापर करून दस्तऐवजांचे मुद्रित घेईल.

२१. **डिजीटल स्वाक्षरी केलेल्या दस्तऐवजांची पडताळणी.**— (१) सक्षम प्राधिकारी हे, कोणताही अधिकृत सेवा प्रदाता किंवा अधिकृत अभिकर्ता किंवा राज्य इलेक्ट्रॉनिक नोंदी संकेतस्थान यांच्याकडून पुरविण्यात आलेले कोणतेही लायसन, परवाना, प्रमाणपत्र, मंजुरी, मान्यता किंवा पोचपावती यांची ऑनलाईन पडताळणी करण्याची यंत्रणा (पोर्टल किंवा संकेतस्थळ) निर्माण करण्याची व्यवस्था करतील.

(२) या नियमांखाली देण्यात आलेला कोणताही दस्तऐवज किंवा प्रमाणपत्र यांच्या सत्यतेची पडताळणी करण्याची इच्छा असलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा प्राधिकाऱ्याला, पडताळणी करण्याची मागणी केलेल्या दस्तऐवजावर मुद्रित केलेल्या असाधारण ओळखचिन्हाचा वापर करून अशा पोर्टलवर किंवा संकेतस्थळावर प्रवेश करता येईल.

२२. **अधिकृत सेवा प्रदाता व अधिकृत अभिकर्ते यांच्या माहिती प्रणालीची व लेख्यांची लेखापरीक्षा.**— (१) संचालक, इलेक्ट्रॉनिक सेवा वितरण हा, माहिती सुरक्षा लेखापरीक्षा संघटना म्हणून नामिका प्रविष्ट झालेल्या अभिकरणांकडून, राज्यातील प्राधिकृत सेवा प्रदाते व त्यांचे अधिकृत अभिकर्ते यांच्या अभिलेखांची व लेख्यांची आवश्यकता वाटेल अशा कालांतराने, लेखापरीक्षा करण्याची व्यवस्था करील.

(२) पोट नियम (१) मध्ये निर्देश केलेल्या लेखापरीक्षेमध्ये, माहितीची सुरक्षितता, विश्वसनीयता व गोपनीयता, इलेक्ट्रॉनिक सेवांचे वितरण करण्यामध्ये वापरलेले कोणतेही ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर कार्यरत असणे व त्याची कामगिरी आणि अधिकृत सेवा प्रदाते व अधिकृत अभिकर्ते यांनी ठेवलेल्या लेख्यांची अचूकता अशासारख्या पैलूंचा समावेश असेल.

(३) संचालक, इलेक्ट्रॉनिक सेवा वितरण यांनी नियुक्त केलेल्या लेखापरीक्षा अभिकरणांना अशी माहिती पुरविणे व सहाय्य करणे, लेखापरीक्षा अभिकरणांनी दिलेल्या निदेशांचे पालन करणे व लेखापरीक्षा अभिकरणांनी निदर्शनास आणून दिलेल्या उणिवा व त्रुटींमध्ये सुधारणा करणे हे अधिकृत सेवा प्रदाता व त्यांचे अधिकृत अभिकर्ते यांच्यावर बंधनकारक असेल.

२३. **इलेक्ट्रॉनिक सेवा वितरणासाठी विशेष लेखनसामग्रीचा वापर करणे.**— (१) सेवा पुरविण्यासाठी अधिकृत सेवा प्रदाते व त्यांचे प्रतिनिधी यांनी वापरलेली विशेष लेखनसामग्री संचालक, इलेक्ट्रॉनिक सेवा पुरवठा यांच्याकडून निर्धारित करण्यात येईल आणि तिच्यामध्ये नमुने, अर्ज, लायसन, परवाने, प्रमाणपत्रे, प्रदान केल्याच्या पोचपावत्या आणि इलेक्ट्रॉनिक सेवा पुरविण्याचा एक भाग असणारे असे इतर दस्तऐवज यांच्यासाठीची सुरक्षा वैशिष्ट्ये असतील.

(२) प्रमाणपत्रे, लायसन व परवाने यांमध्ये, संचालक, इलेक्ट्रॉनिक सेवा वितरण यांच्याकडून निर्धारित करण्यात येईल असे घोषणापत्र असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेश अग्रवाल,**
शासनाचे सचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Directorate of Information Technology, Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032, dated 1st March 2013

*NOTIFICATION*

INFORMATION TECHNOLOGY ACT, 2000.

No. DIT-2011/CR-175/39.— In exercise of the powers conferred by section 90 read with sections 6 and 6A of the Information Technology Act, 2000 (21 of 2000), the Government of Maharashtra hereby makes the following rules, namely :—

1. *Short title.*- These rules may be called the Maharashtra Information Technology (Electronic Service Delivery) Rules, 2013.

[They shall come into force on the date of their publication in the *Official Gazette*.]

2. *Definitions.*—(*1*) In these rules, unless the context otherwise requires,—

(*a*) "Act" means the Information Technology Act, 2000;

(*b*) "authorised agent" means an agent of the Authorised Service Provider and includes an operator of an electronically enabled kiosk or front office who is permitted to deliver public services to the users with the help of a computer resource or any communication device, by following the procedure specified under these rules;

(*c*) "Authorised Service Provider" means an agency including a body corporate or an Agency of the Government, authorised by the Director of Electronic Service Delivery, to establish and manage a system of delivering services electronically, in accordance with these rules;

(*d*) "body corporate" means any company and includes a firm, sole proprietorship or other association of individuals engaged in commercial or professional activities;

(*e*) "certificate" means a certificate required to be issued by an authority empowered under the respective Act, rule, regulation or order of the Government to issue a certificate to confirm the status, right or responsibility of a person, either natural or artificial, in accordance with any such Act, rule, regulation or order of the Government and includes a certificate in electronic form printed and delivered by an Authorised Service Provider with electronic signature on such stationery as may be determined by the Director of Electronic Service Delivery;

(*f*) "Competent Authority" means the Secretaries to the Government, the Head of every Department of the State Government and the Heads of Government Organisations and Government Bodies, as notified by the State Government from time to time;

(*g*) "Director of Electronic Service Delivery" means the official of the Government notified as the Director of Electronic Service Delivery;

(*h*) "e-service" means a service as may be specified by notification by the Government and delivered electronically to the users;

(*i*) "electronic service delivery" means the delivery of public services in the form of receipt of forms and applications, delivery of any license, permit, certificate, sanction or approval and the receipt or payment of money by electronic means or any other such public service rendered by following the procedure specified under these rules;

(*j*) "Government" means the Government of Maharashtra;

(*k*) "notification" means a notification published in the *Official Gazette*;

(*l*) "*official gazette*" means the Maharashtra Government Gazette;

(*m*) "public service" means any service provided by the Government either through its Competent Authorities or any of its agencies either directly or through any authorized service provider, which shall include, *inter alia*, the receipt of forms and applications, delivery of any license, permit, certificate, sanction or approval and the receipt or payment of money;

(*n*) "service charge" means the amount as may be specified by the Government to be payable to the Authorised Service Provider for electronic delivery of services rendered but does not include any duly authorised taxes, charges, dues or any other moneys due in respect of a service payable by any person to the Competent Authority concerned that are otherwise payable under the respective Act, rule, regulation or order of the Government when making an application to the concerned Competent Authority;

(*o*) "signing authority" means an authority empowered under the respective Act, rules, regulations or order of the Government to issue any license, permit, certificate, sanction or approval;

(*p*) "specified" means specified by notification in the *Official Gazette* by the Government;

(*q*) "State Electronic Records Repository" means an electronic repository of all electronically signed records, maintained by Competent Authorities, for the purpose of accessing such records and delivering them to the citizens.

(2) Words and expressions used and not defined in these rules but defined in the Act shall have the same meanings assigned to them in the Act.

3. *System of Electronic Service Delivery.*—(1) For the purpose of efficient delivery, the Government may authorise an Authorised Service Provider to deliver public services through electronically enabled kiosks or any other mechanism for electronic service delivery.

*Explanation.*— It is hereby clarified that the present rules provide for the administration of e-service delivery through Authorised Service Providers and authorised agents whereas other mechanisms of e-service delivery such as State Online Portal, Government Departmental outlets and online services provided to the users directly on the Web shall be administered in the normal manner by the Government Departments and agencies.

(2) The form of application and the format of certificate issued under these rules in relation to any e-service shall be such as may be specified by the Government.

4. *Duty of the Competent Authority to notify the list of public services to be delivered through electronic mode.*— (1) Every Competent Authority shall notify within a period of one hundred and eighty days from the coming into force of these rules,—

(*a*) the public services of the Department, agency or body which can be delivered through electronic mode;

(*b*) the date by which each such service shall be made available through electronic mode;

(*c*) lay down norms for efficiency, quality and accuracy in the form of service levels; and

(*d*) the designated officers for delivery of each such service through electronic mode.

(2) The Competent Authority shall, review and update these publications every year or as frequently as required.

5. *Notification of signing authorities.*—(1) The Competent Authorities shall notify the list of signing authorities in respect of different public services and local limits of their respective jurisdictions in the State duly specifying the nature of such service, the names of the signing authorities, the duration of the authority and the extent of jurisdiction of each such authority.

(2) The Competent Authorities shall inform the Director of Electronic Service Delivery immediately with respect to retirements, transfers, suspensions or termination from services of employees holding positions of signing authorities.

(3) The signing authorities shall also inform their Competent Authorities immediately with respect to their retirements, transfers, suspensions and terminations and the Competent Authorities shall get the changes mentioned in sub-rule (2) implemented in their respective application software.

6. *Functions and Powers of Director of Electronic Service Delivery.*— The Director of Electronic Service Delivery shall discharge the following functions and powers, namely :—

(*a*) to authorise, suspend or terminate the services of the Authorised Service Providers ;

*(b)* to determine norms relating to the selection of authorised agents by the Authorised Service Providers;

*(c)* to determine functions, responsibilities and liabilities of Authorised Service Providers and authorised agents;

*(d)* to determine norms on the service levels to be complied with by the Authorised Service Providers and authorised agents;

*(e)* to determine service charges to be charged by the Authorised Service Providers and authorised agents for providing e-services;

*(f)* to determine terms and conditions relating to the authorisation, suspension or termination of the services of the Authorised Service Providers and authorised agents; and

*(g)* to make alternative arrangements for delivery of e-services, in case of such suspension or termination of services of Authorised Service Providers and authorised agents.

7. *Authorised Service Providers for Electronic Service Delivery.*— The Authorised Service Provider shall provide the notified public services electronically to the users in conformity with these rules, by establishing appropriate delivery infrastructure and a network of authorised agents, as determined by the Director of Electronic Service Delivery.

8 *Appointment of authorised agents by the Authorised Service Provider.*—(1) The Authorised Service Provider may appoint such number of Authorised Agents, as may be required to deliver the services electronically to fulfil the norms of efficiency, quality and accuracy laid down by the Competent Authority.

(2) The Authorised Service Provider shall ensure that he as well as all the authorised agents obtain Digital Signature Certificates before they commence operations for delivery of public service electronically.

(3) The Authorised Service Provider may also impart appropriate training to the authorised agent to impart them the skills required to deliver the electronic services efficiently and in an error-free manner.

9 *Commencement of operations by Authorised Service Provider.*— The Authorised Service Provider shall commence its commercial operation for Electronic Service Delivery only after —

*(a)* he has confirmed in writing or through e-mail duly signed by digital signature to the Director of Electronic Service Delivery with respect to the adoption of procedures and standards specified under these rules; and

*(b)* he has installed facilities and infrastructure needed for efficient delivery of electronic services and in an error-free manner in terms of norms laid down by the Director of Electronic Service Delivery and confirm the same in writing or through e-mail duly signed by digital signature to the Director of Electronic Service Delivery.

10 *Authorised Service Provider to collect service charge.*—(1) The application for an e-service submitted by a user to an Authorised Service Provider or an authorised agent shall be accompanied by such service charge as may be determined by the Director of Electronic Service Delivery which is payable in cash to the Authorised Service Provider, at the time of making the application.

(2) The Director of Electronic Service Delivery may determine service charges by notification for e-services.

(3) The service charges may be different for different e-services such as,—

*(a)* the status enquiry;

*(b)* print-outs related to e-services;

*(c)* the scanning of documents related to e- services;

*(d)* the acknowledgement receipt; and

*(e)* any other e-service.

(*4*) The service charge shall not include any duly authorised taxes, charges, dues or any other moneys due in respect of a service payable by any person to the Competent Authority concerned that are otherwise payable under the respective Act, rule, regulation or order of the Government when making an application to the concerned Competent Authority.

11. *Fee to be collected by service provider.*— (1) Any fee or duly authorised taxes, charges, dues or any other moneys due in respect of a service payable by any person to the Competent Authority concerned that are otherwise payable under the respective Act, rule, regulation or order of the Government when making an application to the concerned Competent Authority, shall also be collected by the Authorised Service Provider or the authorised agent, as the case may be, except for those payments that are ordinarily required to be made in the form of court fee stamps or treasury challans.

(2) The fee collected by the Authorised Service Provider or the authorised agent shall be remitted with the Government treasury as may be determined by the Director of Electronic Service Delivery, by the Authorised Service Provider or the authorised agent as the case may be, in its entirety.

12. *Remittance of service charges and fee by the service provider.*—(1) Out of the service charges collected by the Authorised Service Provider or the authorised agent for an e-service, a percentage of the service charge as may be determined from time to time by the Director of Electronic Service Delivery may be apportioned to the Government.

(2) The share of the Government out of the service charge so collected shall be remitted by the Authorised Service Provider or the authorised agent to Government treasury as may be determined by the Director of Electronic Service Delivery.

13. *Presumption with regard to service charge paid to service provider and other conditions of obtaining e-services.*— (1) Where any person pays a service charge to an Authorised Service Provider or an authorised agent in respect of any notified e-service, the print-out or the electronic prompt acknowledging the payment in the relevant form and manner as may be determined by the Director of Electronic Service Delivery and provided to such person by the Authorised Service Provider or authorised agent shall normally be taken as proof of such payment and it shall be presumed that in normal circumstances the dues or claims, for which the acknowledgement is purportedly issued, have been satisfied to that extent.

(2) The payment of service charges to the Authorised Service Provider or the authorised agent shall by no means create any right or title, temporary or permanent, in nature in favour of a person concerned regarding obtaining the notified e-services.

(3) Mere payment does not necessarily ensure the delivery of services, if all conditions associated with delivery of the service are not met fully at the time of making payment to the Authorised Service Provider or the authorised agent.

14. *Receipt or payment of money by or in favour of Government adopting the system of Electronic Service Delivery.*— The receipt or payment of money by or in favour of Government adopting the system of Electronic Service Delivery shall be deemed to be a receipt or payment effected in compliance with the Financial Code and Treasury Code of the Government.

15. *Filing of form, application or any other document.*—(1) Any form, application or any other document referred to in clause *(a)* of sub-section *(1)* of section 6 of the Act may be filed with any office, authority, body, agency or Authorised Service Provider authorised by the Government using the application software specified by it.

(2) The office, authority, agency or Authorised Service Provider referred to in sub-rule (1) shall, while developing such software, take into account the following features of the electronic record, namely :—

*(a)* life time;

*(b)* preservability;

*(c)* accessibility;

*(d)* readability;

*(e)* comprehensibility in respect of linked information;

*(f)* evidentiary value in terms of authenticity and integrity;

*(g)* controlled destructibility; and

*(h)* augmentability.

16. *Issue or grant of any license, permit, sanction or approval.*— (1) Any license, permit, sanction or approval referred to in clause *(b)* of sub-section *(1)* of section 6 of the Act may be issued or granted by using the application software specified under rule 15.

(2) The license, permit, certificate, sanction or approval so issued shall be in the form prescribed in the respective Act, rule, regulation or order and shall contain the name and designation of the signing authority who had digitally signed and approved the electronic record alongwith the date and time of creation of such record.

17. *Creation of repository of digitally signed electronic records.*—(1) The Competent Authorities may, as soon as, after the coming into effect of these rules create, establish and maintain a repository and database of digitally signed electronic records together with the associated application software and workflow to enable Authorised Service Providers or the authorised agents to access such licenses, permits, certificates, sanctions or approvals, as the case may be, and deliver them to the user.

(2) The relevant security procedures, as specified by the Government, shall be followed by such Competent Authorities, in respect of the electronic data, information, applications, repository of digitally signed electronic records and information technology assets under their respective control.

18. *Procedure for making changes in a repository of digitally signed electronic records.*— (1) Any Competent Authority or any signing authority, either *suo motu*, or on an application by an interested party, may make or order to make an appropriate change in a repository of digitally signed electronic records, after following the procedure prescribed in the respective Act, rule, regulation or order.

(2) Any such authority shall have privileges for making or ordering changes only in respect of the electronic records pertaining to its own jurisdiction.

(3) Any change effected to any record in a repository of digitally signed electronic records, and any addition or deletion of a record from such repository of electronic records shall invariably be digitally signed by the respective authority and an electronic audit trail of all such changes shall be maintained.

19. *Creation of secure application software for Electronic Service Delivery.*—(1) The Competent Authorities shall get appropriate application software created, using which, the Signing Authorities, shall digitally sign the license, permit, certificate, sanction or approvals, and get the same audited by a third party agency, so as to ensure its security, reliability, performance and consistency, before it is deployed.

(2) Every such application software shall, *inter alia*, possess the capability to assign a unique identification to each license, permit, certificate, sanction or approval.

(3) Every Authorised Service Provider shall create its own application software in consultation with the respective Competent Authorities, which shall enable such Authorised Service Providers to deliver electronic services in accordance with these rules.

(4) Every such application software created either by the Competent Authority or the Authorised Service Provider shall, *inter alia*, possess the following features and capabilities, namely :—

*(a)* secure Login of Authorised Agents, as are required to access the application system, through use of Digital Signature Certificates;

*(b)* secure access of Authorised Agents, to the repositories of digitally signed electronic records maintained by the Competent Authorities, for printing and delivery of the digitally signed license, permit, certificate, sanction or approvals; and

*(c)* assign a unique identification to the voucher or receipt issued by any authorised agent while providing electronic services to the citizens.

(5) The Director of Electronic Service Delivery shall get such application software audited by a third party agency, as to ensure its security, reliability, performance and consistency, before it is deployed by the Authorised Service Provider and also as and when changes are made in the application software.

20. *Delivery of e-Services by the Authorised Service Provider or Authorised Agent.*—(1) On a request made by a user for provision of a service, relating to the issue of any license, permit, certificate, sanction or approval and to the receipt or payment of money, the Authorised Service Provider or the authorised agent shall access the respective departmental repository of digitally signed electronic records through their secured application specified in rule 19, in respect of any license, permit, certificate or approval or the database in respect of any payment or receipt.

(2) The Authorised Service Provider or the authorised agent shall be permitted to have such access only with the use of its digital signature certificate.

(3) The Authorised Service Provider or the authorised agent shall accept the specified fees, tax, duty or payment along with the service charge, download the related license, permit, certificate, sanction or approval or the database record relating to any payment or receipt, print the license, permit, certificate, sanction or approval from the repository of digitally signed electronic records, or the payment voucher or receipt from the relevant database, and print the document using the secure application software and the secure stationery.

21. *Verification of Digitally Signed Documents.*—(1) The Competent Authorities shall cause to be created a system (portal or website) of online verification of any license, permit, certificate, sanction, approval or receipt delivered by any Authorised Service Provider or the authorised agent or the State Electronic Records Repository.

(2) Any person or authority, desirous of verifying the authenticity of any document or certificate issued under these rules, may access such portal or the website using the unique identification printed on the document sought to be verified.

22. *Audit of the Information Systems and Accounts of Authorised Service Provider and Authorised Agents.*—(1) The Director of Electronic Service Delivery shall cause an audit to be conducted of the records and accounts of the Authorised Service Providers and their authorised Agents in the State at such intervals as deemed necessary by an agency empanelled as an information security auditing organization.

(2) The audit referred to in sub-rule *(1)* may cover aspects such as security, confidentiality and privacy of information, the functionality and performance of any application software used in the electronic delivery of services and the accuracy of accounts kept by the Authorised Service Providers and their authorised agents.

(3) It shall be incumbent on the Authorised Service Provider and their authorised agents to provide such information and assistance to the audit agencies appointed by the Director of Electronic Service Delivery to comply with the directions given by the audit agencies and to rectify the defects and deficiencies pointed out by the audit agencies.

23. *Use of special stationery in Electronic Service Delivery.*—*(1)* The special stationery used by the Authorised Service Providers and its agents for delivery of the services shall be determined by the Director of Electronic Service Delivery with accompanying security features for forms, applications, licenses, permits, certificates, receipts of payment and such other documents as part of the Electronic Service Delivery.

(2) The certificates, licenses and permits shall carry a declaration in the format as may be determined by the Director of Electronic Service Delivery.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJESH AGGARWAL,
Secretary to the Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.